जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२१/०१/२०२४
## दि.२०/०१/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतु:श्रृंगी पो स्टे १०३/२०२४,भादविक ३०२,२०१ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय २२ वर्षे,रा.सुस रोड,पाषाण,पुणे |
| **आरोपीत** | शिवांशु दयाराम गुप्ता,वय २३ वर्षे,रा.रुम नं.०५,बिल्डींग नं.१५,सेक्टर नं.६,प्रतिकनगर, मोहन वाडी,येरवडा,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १८/०१/२०२४ रोजी रात्री ००/०३ ते ००/३८ वा.चे दरम्यान ए-२०१,माऊंटव्हर्ट ॲल्टेसी,सुस रोड,पाषाण,पुणे याठिकाणी |
| **तपशिल** | चतु:श्रृंगी पो स्टे अ.मयत रजि.नं.१९/२०२४,सीआरपीसी १७४ अन्वये मयताचे झाले तपासाचे चौकशीअंती कागदपत्राचे अवलोकन करता,यातील नमुद इसम शिवांशु दयाराम गुप्ता याने फिर्यादी यांनी त्याचेसोबत बोलायचे नाही असे सांगितल्याने तसेच फिर्यादी यांची आई वर्षा क्षिरसागर,वय-५८ वर्षे,रा.सदर हिनेदेखील शिवांशु गुप्ता यास माझे मुलीसोबत राहु नकोस असे सांगितल्याचे कारणावरून,त्याचा राग मनात धरून,सदर इसमाने फिर्यादी यांची आई वर्षा क्षिरसागर हिचा हाताने तसेच त्यांचे घरातील श्वानाला बांधण्याकरिता असलेल्या गळयातील बेल्टने तीचा गळा आवळुन तीस जीवे ठार मारून,तीची बॉडी पुरावा नष्ट करण्याचे हेतुने तीचे घरातील बेडरूम मध्ये टाकुन निघुन गेला आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस निरीक्षक,(गुन्हे), जगन्नाथ जानकर ९४२३२३७८७५ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मार्केटयार्ड पो स्टे ०८/२०२४,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय ४५ वर्षे,रा.वडगाव-शेरी,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१८/०१/२०२४ रोजी १९/१० वा. मेन रोडवरील भगवती ट्रेडर्स गाळा,मार्केटयार्ड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे मार्केटयार्ड येथे गाळा नं.३५१ येथे पहिल्या मजल्यावर अन्न धान्य दलालीचा व्यवसाय करतात. फिर्यादी यांनी त्यांचे ऑफिस बंद करुन,ऑफीस मधील दिवस भरातील व्यवसायातील जमा झालेली ३,५०,०००/- रूपये रोख रक्कम त्यांचेकडील चॉकलेटी रंगाचे बॅग मध्ये ठेवुन,ती रक्कम त्यांचे मोपेड गाडीचे डिक्की मध्ये ठेवुन,त्यांचे मोपेड गाडी मेन रोडवरील भगवती ट्रेडर्स गाळा येथे लॉक व पार्क करुन,खरेदी करण्यासाठी गेले असताना,कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादी यांचे मोपेड गाडी डिकीत ठेवलेली सदर रक्कम असलेली बॅग चोरी करुन नेली आहे. (फिर्यादी यांनी आजरोजी तक्रार दिली आहे.) |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, राजेश थोरात ९१४६२२४४६६ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**